९८६९३

जा.क्र. प्राथ/क/-------/२०१७
कार्यालय- शिक्षण उपसंचालक
अमरावती विभाग, अमरावती
दिनांक:-

12 4 OCT 2017

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
पोद्दार एज्युकेशन ट्रस्ट,
८५, चमारबाग पोस्ट ऑफीस लेन,
डॉ. आंबेडकर रोड, परेल मुंबई-३२

विषय:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत...

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक एसएफएस-२०१७/प्र.क्र.१८३/एसएम-२, दिनांक ६/५/२०१७

संदर्भिय शासन निर्णयान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन), २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत खालील प्राथमिक ते उच्च माध्यमिक इंग्रजी माध्यमाच्या सी.बी.एस.ई. स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यांत आली आहे त्या शाळेची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नांव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नांव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | पोद्दार एज्युकेशन ट्रस्ट, ८५, चमारबाग पोस्ट ऑफीस लेन, डॉ. आंबेडकररोड, परेल, मुंबई-३२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. ११६, झाकालवाडी, अकोलारोड, वाशिम जि. वाशिम | नवीन शाळा | सी.बी.एस.ई. | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यांस खालील प्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यांत येत आहे.

(अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्यांच्या आंत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

(ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यांत आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची

पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आंत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(क) शासन निर्णय दिनांक २० जुन, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयांतील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरिक्षक, मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनांस अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळांना निकष, अटी व शर्तींची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेकरिता ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

३. परवानगी देण्यांत आलेल्या नवीन शाळेस (१) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच (२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदीची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याची पुढील कार्यवाही करावी.

५. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यांत कोणतेही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यांत येईल.

६. यु-डायस या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यांत आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय UDISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना ***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक कप्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यांत आले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरिता **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(सी.आर.राठोड)
शिक्षण उपसंचालक
अमरावती विभाग, अमरावती

प्रतिलिपी:-

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, वाशिम यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित